दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी


रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २३४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२४ नोव्हेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# जिंकण्यासाठी मैदानात उतरुया ; उद्धव ठाकरेंचा शिवसैनिकांना कानमंत्र

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई महापालिका निवडणुकांसाठी सर्वच पक्षांनी तयारी सुरु केली आहे. आगामी निवडणुकीसाठीची तयारी करा, असे आदेश शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आजच्या बैठकीत मुंबईतील पदाधिकाऱ्यांना दिले. ज्याची सत्ता आहे, ते वॉर्ड पुर्नरचना करणारच, त्यांनी ती करू द्या, आपण जिंकण्यासाठी मैदानात उतरुया, असं म्हणत



उद्धव ठाकरे म्हणाले. ठाकरेंनी आपल्या संबोधनातून कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना बळ देण्याचा प्रयत्न केला.

मुंबई महापालिका आपल्याकडेच राहणार, कामाला लागा, ज्याची सत्ता आहे, ते वॉर्ड पुर्नरचना करणारच, त्यांनी ते करू द्या, आपण जिंकण्यासाठी मैदानात उतरुया, सिनेट निवडणुकीच्या तयारीला लागा, असे आदेश पक्ष प्रमुखांनी दिले आहेत.

## महापालिकांची प्रभाग पुनर्रचना

मुंबई महापालिकेसह राज्यातील २४ महापालिकेची नव्याने प्रभाग रचना करण्याचे आदेश नगर विकास विभागाने मंगळवारी दिले आहेत. आगामी निवडणुका लक्षात घेता, हा निर्णय घेण्यात आला असून, सन २०११ च्या जनगणेनुसार प्रभागांची रचना निश्चित करून त्याचे प्रारूप करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची सूचना नगरविकास विभागाने संबंधित महापालिकेच्या आयुक्तांना केली आहे. मुदत संपलेल्या आणि नजीकच्या कालावधीत मुदत संपणार असलेल्या महापालिकांसाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. यामुळे महापालिकांच्या निवडणुका किमान चार ते सहा महिने पुढे गेल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## मविआचा निर्णय भाजपने बदलला

महाविकास आघाडी सरकारने राज्यातील लोकसंख्या वाढीच्या आधारावर सरासरी प्रभागांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे मुंबई महापालिकांसह इतर अनेक महापालिकांमध्ये नगरसेवकांची संख्या नऊने वाढली होती. या निर्णयाला भाजपकडून विरोध दर्शविण्यात आला होता. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारचा हा निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने बदलला होता. त्यामुळे याप्रकरणी न्यायालयीन लढाई सुरू झाली आहे. या प्रकरणावर अद्याप सुनावणी झालेली नाही. येत्या २८ नोव्हेंबरला याबाबत सुनावणी होणार आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नांदेड-वाघाळा, लातूर, परभणी, चंद्रपूर, मालेगाव, इचलकरंजी या २४ महापालिकांची मुदत संपली आहे.

# दोघा जिवलग मित्रांचा अपघाती मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल/उरण**

पनवेल परिसरात मित्रांकडे किंवा नातेवाईकांकडे गेलेल्या दोन जिवलग मित्रांचा परतीच्या प्रवासात झालेल्या भीषण अपघातात जागच्या जागी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



नव्यानेच अवघ्या सहा महिन्यांपूर्वी घेतलेल्या अर्टीगा गाडीने प्रवास करतांना पळ-स्पे परिसरात झालेल्या अपघातात आवरे गावातील मोहिंदर श्यामकांत गावंड आणि अलंकार नारायण पाटील या दोघांचा जागच्या जागी मृत्यू झाला आहे. अपघात एवढा भयानक होता की दोघांच्या ही डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे दिसून येत आहे. या अपघाताने आवरे गावाने दोन उमदे तरुण गमावल्याने गावात शोककळा पसरली आहे.

उरण तालुक्यातील आवरे गावातील मोहिंदर गावंड आणि अलंकार पाटील हे दोघे युवक मंगळवारी ( दि२२) कोणत्या तरी कामानिमित्त पनवेल भागात गेले होते. रात्रीच्या सुमारास घरी परतत असताना त्यांच्या गाडीला पळस्पे भागात भीषण अपघात झाला त्यात दोघेही जागच्या जागी ठार झाले आहेत. हा अपघात एवढा भीषण होता की गाडीच्या समोरच्या भागाचा अक्षरशः चुरा झाला असून या दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यात दोघांचा ही मृत्यू झाला आहे .

या अपघातात जीव गमावलेल्या दोघांना ही दोन दोन लहान मुले आहेत. अपघातातील मोहिंदर गावंड हा कस्टम क्लिअरिंग एजंट म्हणून काम करीत होता तर अलंकार नारायण पाटील हा पर्ल फ्रेट सर्व्हिसेस मध्ये सुपरवायझर म्हणून नोकरी करीत होता. शालेय जीवनापासून अतिशय जीवलग मित्र असलेल्या या दोघांचा मृत्यू ही एकत्रित एकाच वेळी झाला असल्याने आवरे गाव हळहळला आहे.

# २ सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात घरफोडीसह मोबाईल चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे ताब्यात घेतले आहे.

पनवेल शहर परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोबाईलचोरीसह घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. यासंदर्भात आर-ोपींना जेरबंद करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शिंदे व पोलीस निरीक्षक जोशी यांनी या चोरांना पकडण्यासाठी गुन्हे शाखेचे दोन पथके तयार केले. त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक दळवी, पो.उप.नि अभयसिंह शिंदे, पोहवा. वाघमारे, पोना.राठोड, पोशि. दुधे, मिसाळ, पोना. पाटील, पोहवा रविंद्र राऊत, पोना परेश म्हात्रे, पोना महेंद्र वायकर, पोना विनोद देशमुख, पोना रविंद्र पारधी, पोशि विवेक पारासुर, पोशि प्रसाद घरत आदींनी या चोरट्यांचा शोध घेत असताना त्यांना गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे व तांत्रिक तपासाद्वारे आरोपी सुमित भरत उदरेजा, (वय १९ वर्षे, रा. ठी. शिवाजी नगर झोपडपट्टी, पनवेल) तसेच फरीद अक्रम कोकरे (वय २८ वर्षे, रा. खालचा मोहलला, रोहा, रायगड) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यांतील मोबाइल व इतर ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

# गोरगरीबांवर होणारा अन्याय सहन केला जाणार नाही : पंकज डहाणे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आयुक्तालयातील परिमंडळ २ चे नवनियुक्त पोलीस उपायुक्त यांची आज दै.रायगड नगरीचे संपादक यांनी सदिच्छा भेट घेतली असता त्यांनी सांगितले की, गोरगरीबांची तसेच ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेतली जाईल. गुन्हेगार प्रवृत्तीकडून संबंधितांवर अन्याय होत असेल तर कटाक्षाने त्यांना शासन केले जाईल. तसेच महिला सुरक्षेवरही अधिक भर दिला जाईल, असे त्यांनी निक्षून सांगितले.

पंकज डहाणे हे कडक शिस्तीचे एक कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी म्हणून त्यांची ख्याती आहे. २०१७ साली नवी मुंबई आयुक्तालयातील परिमंडळ १ येथे विशेष शाखा पोलीस उपायुक्तपदी त्यांनी अत्यंत



चांगल्या प्रकारची सर्वसामान्यांना सेवा दिली आहे. त्यांचे मुळ गाव अमरावती असून डहाणे हे २००५ साली लातूर येथे पोलीस दलात रुजू झाल्यानंतर आपल्या कार्याचा उत्तम ठसा उमटवित पोलीस दलात अनेक ठिकाणी त्यांनी चोख काम केले.

लातूर येथील उल्लेखनिय कामगिरीबरोबरच भंडारा व नाशिक येथे सहाय्यक पोलीस आयुक्त व नाशिक कुंभमेळा पोलीस उपायुक्तपदी कौतुकास्पद कामगिरी सांभाळली. तर २०१५ साली ते पुण्याच्या गुन्हे शाखेत पोलीस उपायुक्त कार्यरत असताना तेथेही गुन्हेगारीवर त्यांचा चांगला वचक होता.

त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यात ते यशस्वी झाले. नागपूर येथे एसआरपीएफ कमांडर पदावर उत्कृष्ट कामगिरी त्यांनी बजाविल्यानंतर शासनाने त्यांच्यावर परिमंडळ २ पोलीस उपायुक्त पदाची जबाबदारी दिली आहे. परिमंडळ २ येथेही कायदा व सुव्यवस्था उत्तमरित्या सांभाळण्याचे चोख काम ते करणार असल्याचे त्यांनी दै.रायगड नगरीशी बोलताना आपले मत व्यक्त केले.

# महाविकास आघाडीच्या माध्यमातून ग्रामपंचायती लढविण्याचे महेंद्र घरत यांचे संकेत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

येत्या १८ डिसेंबर २०२२ रोजी होऊ घातलेल्या उरण तालुक्यात १८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका ह्या महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढविण्याचे संकेत रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत यांनी दिले. आज उरण तालुक्यातील प्रमुख नेते व कार्यकर्ते यांच्या सोबत झालेल्या बैठकीत हे संकेत देण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, प्रदेश सदस्य डॉ. मनिष पाटील, उपाध्यक्ष किरीट पाटील, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, जेष्ठ नेते महेंद्र ठाकूर, कमलाकर घरत, भालचंद्र घरत, दिपक ठाकूर, लंकेश ठाकूर, अजित ठाकूर, श्रेयश घरत, विनोद पाटील, तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

## सिडकोने केले हक्काच्या घराचे स्वप्न साकार

# सिडकोच्या महागृहनिर्माण योजना ऑगस्ट - २०२२ ची संगणकीय सोडत संपन्न



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना ऑगस्ट - २०२२ करीता संगणकीय सोडत दि. २३ नोव्हेंबर २०२२ रोजी सिडको भवन येथील सिडको सभागृहामध्ये पार पडली. सिडकोतर्फे ३१ ऑगस्ट २०२२ रोजी या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येऊन नवी मुंबईच्या विविध नोडमधील सिडकोच्या गृहनिर्माण योजनेतील उपलब्ध ४,१५८ घरे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती.

सदर संगणकीय सोडत प्रक्रियेवर देखरेख करण्याकरिता सिडकोतर्फे श्री. सुरेश कुमार, माजी लोकायुक्त यांच्या पर्यवेक्षणाखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. श्री. मोईझ हुसेन हेही या समितीतील एक सदस्य होते. सोडतीमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांनी सिडकोमुळे नवी मुंबईसारख्या सोयी सुविधांनी परिपूर्ण शहरात आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना यावेळी बोलून दाखवली.

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील द्रोणागिरी, कळंबोली, तळोजा आणि खारघर नोडमधील सिडकोच्या गृहनिर्माण योजनेतील ४,१५८ घरे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. परवडणाऱ्या दरातील या ४,१५८ घरांपैकी ४०४ घरे (उत्पन्न मर्यादा - ० ते ३ लाख) ही प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि उर्वरित ३,७५४ घरे (उत्पन्न मर्यादा -३ लाखांपेक्षा अधिक) ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती.

या महागृहनिर्माण योजनेस नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळून सुमारे १६,००० अर्ज प्राप्त झाले. महागृहनिर्माण योजनेकरिता ऑनलाइन अर्ज करण्यास ०३ ऑक्टोबर २०२२ ही अंतिम तारीख होती. परंतु, अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ घेता यावा, याकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणीस ०३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला होता. यामुळे सुमारे ४ हजारांहून अधिक कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होणे शक्य झाले.

सिडकोतर्फे गृहनिर्माण योजनेच्या संगणकीय सोडतीसाठी वापरण्यात येणारी प्रणाली (सॉफ्टवेअर) ही पूर्णत: मानवी हस्तक्षेपविरहित आहे. तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मुंबई येथील संगणक विभागाकडून या प्रणालीची तपासणी

.../२

# आवरे विद्यालयात स्फोट घडविण्याचा प्रयत्न

## आवरे विद्यालयात स्फोट घडविण्याचा प्रयत्न



**दै.रायगड नगरी । उरण**

आवरे येथील रामचंद्र म्हात्रे कनिष्ठ विद्यालयात तथा ज्युनिअर कॉलेज मध्ये समाज कंटका कडून गॅस सिलिंडरच्या साह्याने स्फोट घडविण्याचा प्रकार उजेडात आला आहे. या घटने संदर्भात विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष ठाकूर यांनी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून विद्यालयात स्फोट घडवून इमारतीच्या वर्ग खोल्यांच्या साहित्याची व विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराच्या अन्नधान्याचा नाश करणाऱ्या सदर विघ्न संतोषी समाज कंटकाचा पोलीसांनी शोध घ्यावा अशी मागणी केली आहे.

उरण पुर्व विभागातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी आवरे गावातील थोर समाजसुधारक कै.बाळासाहेब म्हात्रे यांनी आवरे या अति दुर्गम गावात सुमारे १९९२ साली रामचंद्र म्हात्रे कनिष्ठ विद्यालय तथा ज्युनिअर कॉलेज ची स्थापना केली आहे. या विद्यालयात इयत्ता ५ वी ते १२ वी ( सायन्स, काँमस आणि आर्टस ) मध्ये जवळ जवळ ८५४ विद्यार्थी आपले शिक्षण घेत आहेत. या विद्यालयात उत्तम दर्जाचे शिक्षण मिळत असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे.

अशा या आवरे गावातील विद्यालयाच्या इमारतीमधील वर्ग खोल्यांच्या साहित्याची समाज कंटकानी नासधुस केली. तसेच विद्यालयातील गॅस सिलिंडर चालू करून

.../२






# मुरुडच्या सर एस.ए.हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचे गेट टुगेदर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूडच्या जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस.ए.हायस्कूलच्या सन.१९७२-७३ एस.एस.सी. बॅच मधील माजी विद्यार्थ्यांनी गेट टुगेदर आयोजित करून आठवणींना उजाळा दिला !

सर.एस.ए. हायस्कूलचे उपाध्यक्षा प्रतिभा जोशी,कार्यवाह चंद्रकांत अपराध तथा बॅचचा विद्यार्थी,संचालक मंडळातील प्रमोद भायदे,अभय दिवेकर,उध्दव दांडेकर,प्रकाश दांडेकर व सर्व विद्यार्थी मित्र हायस्कूलचे माजी प्राध्यापक तथा ज्येष्ठ पत्रकार मेघराज जाधव,मदन हणमंते यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सरस्वतीला पुष्पहार अर्पण करण्यात आला.दिवंगत गुरूवर्य, विद्यार्थी मित्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.तद्नंतर सर्व मान्यवरांचे श्रीफळ,शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.प्रथम कै द.दां.पेंडसे सरांनी लिहिलेली त्याला राम सरांनी चाल लावलेली शाळेविषयीची कविता आनंद रणदिवे व नलिनी भायदे यांनी आपल्या सुरेल आवाजात गायली.

कार्यक्रमाचे औचित्य साधून १९७२-७३ बॅचचे माजी विद्यार्थी डॉ. गिरीष सबनीस त्यावेळी बोर्डात ३५ वा क्रमांक मिळाल्याबद्दल व आता विद्यमान डॉक्टर म्हणून कार्यरत असल्याबद्दल अभिमान व कौतुक म्हणून विद्यार्थी मित्र परिवाराकडून डॉक्टर गिरीश व त्यांच्या सौभाग्यवती अर्चना यांचा मान्यवरांकडून श्रीफळ ,शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी आपल्या मनोगतात डॉ. गिरीष सबनीस यांनी आपले वडील कै. रामचंद्र भगवंत सबनीस यांचेही स्मरण केले. कै मुख्याध्यापक श्रीराम प्रधान सर,कै साने सर सर्व गुरूवर्य,शिपाई यांच्याही आठवणींना उजाळा दिला. नैनिता कर्णिक,कुंदा चाफीलकर अलका पालवणकर,आनंद रणदिवे अनिल पुलेकर यांनी शाळेविषयी स्वरचित कविताचे गायन केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून विशेष कामाबद्दल नैनिता कर्णिक ,अलका पालवणकर,प्रकाश विरकुड,वासंती हणमंते,यांना सन्मानित करण्यात आले.याच बरोबर मित्रपरिवाराला आपले निवासस्थान माफक दरात उपलब्ध करून दिल्याबद्दल समाजसेवक आण्णा कंधारे तसेच गायक नितीन मिठाग्री यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

शाळेच्या उपाध्यक्षा प्रतिभा जोशी यांनी माजी विद्यार्थ्यांनी शाळेची आठवण ठेवल्याबद्दल त्यांना धन्यवाद व शुभेच्छा दिल्या.संचालक प्रमोद भायदे यांनी शाळेच्या वस्तुस्थितीवर सांगताना कै.भाई दांडेकर यांच्या योगदानाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे यांनीही शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यात प्रयत्नशील असल्याचे सांगितले.व कै द.दां.पेंडसे यांचे शाळेविषयीचे स्वरचितगीत शाळेच्या कार्यक्रमास म्हणण्याचे नमुद केले. अविनाश साळी यांनी शाळेला सोलर पॅनल भेटवस्तू देण्यात भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिल पुलेकर,आनंद रणदिवे,अविनाश साळी, डॉ.गिरीश सबनीस,जया ठाकुर,नंदकुमार भगत,विनोद भगत, कुमार खोत ,कुंदा चाफीलकर वासंती हणमंते यांनी विशेष परिश्रम घेतले.या आगळ्यावेगळ्या गेट टुगेदर कार्यक्रमात ६० माजी विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. सूत्रसंचालन अनिल पुलेकर यांनी तर चंद्रकांत अपराध यांनी आभार मानले.

# दत्तजयंती निमित्ताने उरण नगरपालिकेत बैठक

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील देऊळवाडी येथील दत्त मंदिर येथे मोठ्या प्रमाणात दत्तजयंती ची ७ डिसेंबर २०२२ रोजी यात्रा भरणार आहे. अनेक वर्षांपासून दत्त जयंतीला उरण शहरात यात्रा भरत असते. उरण तालुक्यातील सर्व गावातील लोक या यात्रेसाठी येत असतात तर या ठिकाणी मुंबई पनवेल गोवंडी मुंब्रा कुर्ला येथून खेळणी विक्रेते स्टॉल धारक सर्व प्रकारचे व्यापारी दुकानदार येत असतात अशा वेळी वाहतूक कोंडी शांतता व सुव्यवस्था यासाठी उरण मध्ये बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्यधिकारी राहुल इंगळे उरण पोलीस निरीक्षक अशोक गायकवाड, जगदाने आदी मान्यवर उपस्थित होते. सुरवातीला प्रस्तावित नगर परिषदेचे अधिकारी झुंबर माने यांनी केले. यावेळी शहर चिटणीस शेकाप शेखर पाटील यांनी वाहतूक कोंडी दुर होण्यासाठी कोटनाका येथील पेट्रोल पंप शेजारच्या मैदानात तर चारफाटा च्या पुढे मुळेखंड फाटा तर मोरा परीसरात तील नागरिक जुना राजीव गांधी टाऊन हाल च्या शेजारच्या मैदानात करावी तसेच दुकानदार याना ओळखपत्र व रुग्णवाहिक डॉक्टर फायर ब्रिगेड च्या गाड्या तैनात ठेवाव्यात असे सुचवले. तसेच स्वयंसेवी संस्था यामध्ये होमगार्ड, सामाजिक संस्था यांची गर्दी नियंत्रण करण्यासाठी मदत घ्यावी असे सुचवले. यावेळी सीमा घरत, दिलीप पाटील, प्रकाश पाटील, नगरसेवक कौशिक शहा, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांनी सूचना मांडल्या या सर्व सूचना चा नक्कीच विचार करून दत्त जयंती उत्सव साजरा करू या असे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी सांगितले. तर वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पोलीस नेमण्यात येतील तसेच नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखावी असे आवाहन पोलीस निरीक्षक अशोक गायकवाड यांनी केले.यावेळी उरण शहरातील विक्रेते, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते राजकीय कार्यकर्ते उपस्थित होते



# नारायण गजानन वेदक यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दैवज्ञ समाज तळा आधारस्तंभ हरहुन्नरी आणि कर्तबगार असे नारायण गजानन वेदक यांचे वृद्धापकाळाने पनवेल येथे निधन झाले.



नारायण वेदक यांचे जन्म गाव तळा, ता.तळा, जि.रायगड तळे येथे प्राथमिक शिक्षण घेवून पुढील शिक्षण पनवेल येथे घेतले. ते शिक्षक म्हणून नोकरीवर रुजू झाले. त्यानंतर इंदापूर, वरसगांव, तळवली, खरवली, जामगाव येथील त्यांचे शिक्षकेत्तर कालावधीमधील त्यांच्या कर्तृत्वची दाद जिल्हा परिषदेने घेवून त्यांनी मुख्याध्यापक त्यानंतर केंद्रप्रमुख म्हणून त्यांची पदोन्नती झाली. सेवानिवृत्तीनंतर त्यंनी आपले सेवा कार्य सातत्याने पुढे चालूच ठेवले आणि ज्येष्ठ नागरिक आणि पेन्शनर संघटनेचे तळा तालुक्याचे ते सेक्रेटरी झाले. आपल्या कारकिर्दीत शिक्षकांच्या पेन्शन बाबतच्या अनेक समस्यांचे निवारण करून नावलौकिक कमाविले. इंदापूर गणेश मंदिराच्या विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी म्हणून ते कार्यभार सांभाळीत होते. तळे दैवज्ञ समाजाचे माजी अध्यक्ष, श्री लक्ष्मी नारायण मंदिराचे विश्वस्त, श्री कोंडजाई मंदिराचे विश्वस्त म्हणून त्यांनी विशेष कार्य केले. एक प्रेमळ, मनमिळावू स्वभावाचे कुशल, संघटक, समाजसेवक, एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांची जनमानसात ओळख होती. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात त्यांची उल्लेखनिय कामगिरी होती. त्यांची अर्धांगिनी कमलावती नारायण वेदक या देखील एक शिक्षिका, मुख्याध्यापिका होत्या. त्यांचे त्यांना मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या पश्चात मुलगा आणि चार मुली व नातवंडे आणि दोन बहिणी असा परिवार आहे.

श्री देवी कोंडजाई मंदिर ट्रस्ट तळा, श्री लक्ष्मी नरायण मंदिर ट्रस्ट तळा, अखिल भारतीय दैवज्ञ ब्राह्मण समाज मुंबई, तळे दैवज्ञ ब्राह्मण समाज तळे, पेन्शनर संघटना तळा या सर्वांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सिडकोने केले हक्काच्या घराचे स्वप्न साकार

करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे काढण्यात येणाऱ्या सोडत प्रक्रियेमध्ये अर्जदारांमधील निवडक प्रतिनिधींना पंच म्हणून सहभागी करून घेतले जाते. तसेच सोडती दरम्यान पात्र अर्जदारांच्या आणि सदनिकांच्या यादीची यादृच्छिक पद्धतीने सरमिसळ करण्यात येते. अत्यंत पारदर्शक व निष्पक्ष अशा या प्रक्रियेद्वारे सर्व अर्जदारांना समान संधी सुनिश्चित करण्यात येते.

महागृहनिर्माण योजना ऑगस्ट - २०२२ च्या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी सिडकोच्या श्र्ीेंशी.लळवलेळप-वळर.लो या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम १५ दिवसांच्या कालावधीमध्ये परत केली जाईल.

महागृहनिर्माण योजना ऑगस्ट - २०२२ मध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांचे डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी अभिनंदन केले. तसेच अयशस्वी ठरलेल्या अर्जदारांनी निराश न होता सिडकोच्या महागृहनिर्माण योजना दिवाळी - २०२२ करीता अर्ज करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

महागृहनिर्माण योजना दिवाळी - २०२२ अंतर्गत वेगाने विकसित होत असलेल्या उलवे नोडमधील बामणडोंगरी रेल्वे स्थानक, खारकोपर पूर्व २ए, खारकोपर पूर्व २बी आणि खारकोपर पूर्व पी३ येथे ७,८४९ सदनिका प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या गृहनिर्माण योजनेद्वारे रेल्वे, महामार्ग, एमटीएचएल यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या व आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यात उलवे नोडमध्ये हक्काचे घर घेण्याची संधी नागरिकांना प्राप्त झाली आहे.

## आवरे विद्यालयात स्फोट घडविण्याचा प्रयत्न

स्फोट घडविण्याचा प्रयत्न गुरुवारी ( दि१७) रात्रीच्या अंधाराचा फायदा उठवत केला आहे. विद्यालया जवळील रहिवाशी, शिक्षक व शिपाई यांच्या सतर्कतेमुळे हा प्रयत्न फसला आहे. या घटनेचे गांभीर्य ओळखून विद्यालयाचे मुख्याध्यापक व कमिटी यांनी उरण पोलीस ठाण्यात अज्ञात समाज कंटका विरोधात तक्रार दाखल केली आहे. उरण पोलीस या घटनेसंदर्भात सदर तपास करण्यासाठी प्रयत्न करत नाहीत याचा फायदा उठवत सदर समाजकंटकांनी नवीमुंबई पोलीस यंत्रणेसमोर आवाहन उभे करत सोमवारी ( दि २१) पुन्हा एकदा विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून देण्यात येत असलेल्या पोषण आहाराच्या अन्नधान्याची नासधुस केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे भयभीत झालेल्या विद्यालयानी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळेतील विद्यार्थ्यांना एक दिवस सुट्टी देण्याचा व विद्यालयात सी सी टिव्ही बसविण्याचा निर्णय घेतल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष ठाकूर यांनी दिली आहे. तसेच सदर घटनेला जबाबदार असणाऱ्या समाज कंटकाला तात्काळ पोलीसांनी ताब्यात घ्यावे अशी मागणी ही केली आहे.

# गोवंशाची चोरी करून त्यांचा छळ करणाऱ्या आरोपींला म्हसळा पोलीसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

शिवसेना भाजप युती सरकारच्या कार्यकाळात महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यात गोहत्या बंदी घातल्या पासुन म्हसळा तालुक्यातील गवागावातील शेतकऱ्यांची गुरे चोरीला गेल्याची घटनेत वाढ झाली होती. गोवांश चोरी करून त्यांची हत्या करण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी म्हसळा पोलिस ठाणेत नोंद करण्यात आलेल्या आहेत. या घटनांत म्हसळा पोलिस ठाण्याचे प्र.पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले आसुन अशाच प्रकारच्या घटनांत अलिबाग येथे अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींना म्ह-सळा पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली असल्याची माहिती प्र. पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी दिली आहे.

अधिक माहिती देताना म्हसळा पोलीस स्टेशन गु.रजि. नं.११३/२२,भादवी कलम ३७९,४२९,३४सह महाराष्ट्र पशु आणि प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५,५(ल),६,९,प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ङ) या गुन्हयातील आरोपी अमन मुरतूजा घारे खान,वय २१, रा. झकेरिया मस्जिद स्ट्रीट, डोंगरी मुंबई याला म्हसळा पोलीसांनी मुरुड येथून ताब्यात घेऊन चौकशी केली असता आरोपींनी गून्ह्याची कबुली दिल्याने त्यांना अटक केली असून पुढील तपास पी.एस.आय.सुर्यवंशी करत आहेत.

गोवंश चोरी प्रकरणी अटक आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी म्हसळा तालुक्यातील नागरिकांनी केली असून या प्रकरणात म्हसळा पोलीसांनी पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे यांनी कार्यत्तत्परता दाखवली असल्याने त्यांचे कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नेटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ मालक कै.सिताबाई जगन्नाथ पाटील (मयत) चे वारस व कै.जगन्नाथ हरिभाऊ पाटील (मयत) चे वारस १) श्री.संजय जगन्नाथ पाटील २) श्री.राजेश जगन्नाथ पाटील ३) श्री.किशोर जगन्नाथ पाटील ४) सौ.वनिता ज्ञानेश्वर पाटील रा.नावडे गांव, कळंबोली नोड, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीची मिळकत सिडकोने १२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी मिळणारा भूखंड आमचे अशिल हे सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेण्याचे ठरविले आहे. सदरहू संपादीत जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | युनिट केस/ मिळकत नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए. गुंठे |
|---|---|---|---|---|
| नावडे | ८५/३७ | २६ | २ | ०-४६-८ |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्य पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दि.२३/११/२०२२

सही/-
**ॲड.रेखा कि.होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर-१ ए, प्रभात सेंटर, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**



## सूचना

**मेसर्स डी.एस.व्ही.केमिकल्स प्रा.लि.च्या प्लॉट नंबर १०, ईसांबे, पोस्ट : माझगाव, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड येथील कारखान्यात कार्यरत असलेल्या खालील संपकरी कामगारांना या सुचनेद्वारे कळविण्यात येते की, त्यांना सर्व रजा उपभोगल्या नंतर देखील वर्षातून पन्नास दिवसापेक्षा अधिक दिवस गैरहजर राहिल्याबद्दल आणि / किंवा रजे शिवाय कामगार गैर हजर राहण्याच्या सवयी बाबत त्यांचे लेखी स्पष्टीकरण मागणारे दि.०७/११/२०२२ रोजीचे पत्र प्लॅन्ट मॅनेजर यांनी दि.११/११/२०२२ रोजी वाजता कारखान्याच्या आवारात व्यक्तीशः दिले असता त्यांनी ते घेण्यास नकार दिला म्हणून सदर पत्रे संबंधित कामगारांना कंपनी कडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या स्थानिक पत्यावर रजि ए.डी.पत्राद्वारे पाठविण्यात आले होते. परंतु रजि. ए.डी.पोस्टाद्वारे पाठविलेली पत्रे स्वीकारत नाही, 'रिफ्युज्ड', या शेऱ्यांनिशी पोस्टाने व्यवस्थापनाकडे परत पाठविली.**

**या परिस्थितीत संबंधित कामगारांना सल्ला देण्यात येत आहे की, जर त्यांची इच्छा असल्यास ते कारखान्यातून प्लॅन्ट मॅनेजर यांच्या कउून कामच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ती पत्रे घेवून जावू शकतात व त्यांचे याबाबतचे लेखी स्पष्टीकरण तीन दिवसाच्या आत व्यवस्थापनास सादर करावे अन्यथा त्यांच्या विरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

| कामगारांची नावे | पोस्टाचा शेरा |
|---|---|
| १) श्री.दिपक देवघरे | 'स्वीकारत नाही' |
| २) श्री.नथुराम देवघरे | 'स्वीकारत नाही' |
| ३) श्री.समित महाडिक | 'स्वीकारत नाही' |
| ४) श्री.कैलास थोरवे | 'रिफ्युज्ड' |
| ५) श्री.मधुकर साळुंके | 'रिफ्युज्ड' |
| ६) श्री.धनाजी एम. देवघरे | 'स्वीकारत नाही' |
| ७) श्री.कुंदन कुमार सिंग | 'स्वीकारत नाही' |
| ८) श्री.विष्णू बी पवार | 'स्वीकारत नाही' |
| ९) श्री.भगवान वाघे | 'स्वीकारत नाही' |
| १०) श्री.गणेश आर काठवले | 'स्वीकारत नाही' |
| ११) श्री.कुशल सुरावकर | 'स्वीकारत नाही' |

**सही/-**
**मेसर्स डी.एस.व्ही.**
**केमिकल्स प्रा.लि.करिता**



ॲड.रेखा होवाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर
चौ.अर्ज क्र.१७०९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०१/२०२३

१) श्रीमती.जयश्री कृष्णा मानकर
२) श्री.सुरज कृष्णा मानकर
३) चैतली कृष्णा मानकर
रा.एस.एस.२/ए, रुम क्र.४९२,
सेक्टर २, कोपरखैरणे, नवी मुंबई ... अर्जदार

ज्यापेक्षा मयत श्री.कृष्णा बंडु मानकर यांचा मृत्यू दि.०५/११/२०१९ रोजी डॉ.डी.वाय.पाटील रुग्णालय, नेरुळ, येथे निधन झाले आहे. अर्जदार क्र.१ ही पत्नी व अर्जदार क्र.२ आणि ३ हे त्यांचे मुले आहे. आणि अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

SCHEDULE OF PROPERTY 'A'

Name Of the Property Holder : Late Krushna Bandu Mankar

Flat No.101, First Floor, F Wing, Building known as Shree Jyotirling Complex, (Survey No.140/0), at Village Deravli, Ploat of land bearing Survey No.140/0, Taluka-Panvel, District-Raigad. Admeasuring area 265.20 Sq. Ft. is equivalent 24.64 Sq. Mtrs. Carpert area 29.57 Sq. Mtrs. Built-up area.

Agreement Value Rs. 7,80,000/- (Rupees Seven Lakhs Eighty Thousand Only)

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

दि.२३ माहे ११ सन २०२२ बेलिफाकडे

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शिवशंभु प्रतिष्ठान मार्फत अवचितगडावर निरंतर संवर्धन

**दै.रायगड नगरी । रोहा**

गड-किल्ले संवर्धनाचा ध्यास घेतलेल्या शिवशंभु प्रतिष्ठान मार्फत अवचितगडावर निरंतर संवर्धनाची मोहिम यशस्वीरित्या संपन्न करण्यात आली आहे.

एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की ते ध्येय पुर्णत्वास जाई पर्यंत थांबायच नसते. असाच काहीसा प्रत्यय येतोय तो शिवशंभु प्रतिष्ठान मार्फत अवचितगड संवर्धनाच्या बाबतीत राबविण्यात आलेल्या मोहिमेतून.

रोहा तालुक्यातील शिवकार्यात आणि संवर्धन कार्यात अग्रेसर असलेली संस्था म्हणजे शिवशंभु प्रतिष्ठान.. नुकतीच शिवशंभु प्रतिष्ठानची अवचितगडावर ४६ वी संवर्धन मोहीम पार पडली.तर शिवशंभु प्रतिष्ठानच्या मागील आठ वर्षांचा आढावा घेतला असता एखाद्या संस्थेच्या माध्यमातून अशा पद्धतीचे निरंतर संवर्धन कार्य फार कमी वेळा पहायला मिळते. परंतू गेली आठ वर्ष शिवशंभु प्रतिष्ठान अवचित गडासोबतच घोसाळगड, बिरवाडीगडावर संवर्धन करत आहे. त्यांच्या या निरंतर सेवेचे समाजातून विशेषत: इतिहासप्रेमींकडून विशेष असे कौतुक होताना दिसत आहे. छत्रपतींचा इतिहास जनमानसात रुजवण्या सोबतच, छत्रपतींनी इतिहास ज्या गडकोटांच्या सहाय्याने घडवला ते गडकोट जपणे म्हणजे परमपवित्र कार्य। आज तेच कार्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेली आठ वर्ष निरंतर केले जात आहे.

# जेएनपीए येथे सागरी जल गुणवत्ता देखरेख केंद्राचे उद्घाटन

## शाश्वत विकास कार्यामध्ये अग्रस्थानी राहण्यासाठी विद्युत पर्यावरण निरीक्षण वाहनाचा शुभारंभ



**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए हे भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर आहे. जेएनपीएने आयआयटी मद्रासच्या सिव्हिल इंजिनीअरिंग विभागाच्या सहकार्याने बंदरामध्ये एक सतत सागरी जल गुणवत्ता देखरेख केंद्र विकसित केले आहे. यासोबतच बंदरामध्ये विद्युत पर्यावरण निरीक्षण वाहन सुद्धा लॉंच केले. या निरीक्षण केंद्र आणि ई-निरीक्षण वाहनाचे उद्घाटन जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपाध्यक्ष उन्मेष वाघ, व सर्व विभागाध्यक्ष उपस्थित होते.

जेएनपीए शाश्वत विकासामध्ये अग्रस्थान साध्य करण्यासाठी आणि आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय मापदंडांमध्ये वर्णित व्यापार मूल्य निर्माण करण्यासाठी वचनबद्ध आहे. जेएनपीए नेहमीच पर्यावरणीय दृष्ट्या जबाबदार बंदर म्हणून विकसित होण्यासाठी आग्रही आहे. सतत सागरी जल गुणवत्ता देखरेख केंद्र आणि ई-वाहनांचे लॉंचिंग हे शाश्वत विकासाच्या वचनबद्धतेच्या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल असल्याचे जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांनी म्हटले आहे.सतत सागरी जल गुणवत्ता प्रणाली आणि विद्युत निगरानी वाहनामुळे जेएनपीएला बंदर क्षेत्रातील सागरी जल आणि हवेच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी, बंदर क्षेत्रातील पर्यावरणीय गुणवत्तेचे नियमन करण्यास मदत होईल.

त्याचबरोबर या सुविधेद्वारे, जल गुणवत्ता केंद्रामध्ये संकलित केल्या जाणा-या तापमान, पीएच, विरघळलेला ऑक्सिजन, अमोनिया, कंडक्टिविटी, नायट्रेट, क्षारता यासारख्या माहितीच्या आधारे बंदर परिसरातील पर्यावरणीय गुणवत्तेचे पालन व तपासण्याव्यतिरिक्त वाहनांमुळे निर्माण होणा-या हरित वायुचे प्रमाण कमी करण्यास जेएनपीए सक्षम होईल. सागरी पाण्याचा टीडीएस, सागरी पाण्याच्या गुणवत्-ेचा डेटाबेस सागरी वातावरणात स्वच्छता मानके राखण्यासाठी आवश्यक आहे. ई-वाहनांमुळे जेएनपीए मध्ये सुरू असलेल्या परिवेशी वायु गुणवत्ता आणि ध्वनी निरीक्षण क्रियाकलापांना देखील पुष्टी प्राप्त होते.

जेएनपीएने विविध पर्यावरणीय सुधारणा आणि हरित बंदर उपक्रम सुरू केले आहेत उदा: सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, सतत परिवेशी वायु गुणवत्ता देखरेख केंद्र, व्यापक घनकचरा व्यवस्थापन सुविधा, बंदर परिसरात आणि टाउनशिपमध्ये एलईडी दिवे, ई-आरटीजीसीएस, किनार्यावरील वीज पुरवठा, शेवा मंदिर आणि शेवा टेकडीच्या पायथ्याजवळील तलावांचे पुनरुत्थान, सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा येथे सुलभ वाहतूकीसाठी केलेले उपाय, खारफुटीचे व्यवस्थापन, तेल गळती प्रतिसाद इत्यादीसह पोर्ट ग्रीन कव्हर यासोबतच जवाहरलाल नेहरू पोर्टने सुमारे ४.१० मेगावाट क्षमतेचे सौर पॅनेल देखील स्थापित केले आहेत. बंदराच्या ३८ टक्के उर्जेची आवश्यकता अक्षय ऊर्जेतुन पूर्ण होते. जेएनपीएने उर्जेचा वापर कमी करण्यासाठी व कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी बंदर परिसरात एलईडी दिवे देखील लावले आहेत.

# गतिमंद मुलगा पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर बस स्थानक परिसरात एक गतिमंद मुलगा आढळून आला असून सध्या तो पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात आहे.

सदर मुलगा हा पहाटे पनवेल शहर बस थानाक येथे फिरताना मिळून आलेला आहे.

तरी त्याला त्याचे पालकांचा पत्ता सांगता येत नाही बोलण्यावरून थोडा गतिमंद असावा असे वाटते तरी याचे बाबत काही माहिती मिळाल्यास तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाणे चे सपोनि राहुल लोखंडे ९८८१७४४७७१ यांचेशी संपर्क साधावा हि विनंती.

नमूद मुलास पंचदिप बालगृह येथे सुरक्षे कामी ठेवण्यात आले आहे.

## खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देऊन व्यावसायिकाकडून...

# तब्बल ५३ लाख रुपयांची खंडणी उकळणारे दोघे खंडणीखोर अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओळखीचा फायदा उचलत दोघा खंडणीखोरांनी नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका व्यवसायिकाला खोट्या गुह्यात अडकवण्याची तसेच त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी देऊन त्यांच्याकडून तब्बल ५२ लाख ४१ हजाराची खंडणी उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सदानंद वाकुर्ले व प्रथमेश वाकुर्ले अशी या खंडणीखोरांची नावे असुन खांदेश्वर पोलिसांनी या दोघा खंडणीखोरांना सापळा लावून अटक केली आहे.

या प्रकणातील तक्रारदार राजेश पटेल (५०) हे नवीन पन-वेल सेक्टर-३ भागात राहण्यास असून त्यांचे त्याच परिसरामध्ये मेडीकल शॉप आहे. त्यांच्याकडे मिलींद जाधव हा मागील १४ वर्षापासून कामाला असून त्याचा मेव्हणा सदानंद वाकुर्ले हा मिलींदला भेटण्यासाठी येत असल्याने त्याची आणि पटेल याची चांगली ओळख झाली होती. त्यामुळे सदानंद हा देखील सदर मेडीकल दुकानात येऊन बसत होता. दरम्यान, श्रवणकुमार जैस्वाल हा देखील पटेल यांच्याकडे अनेक वर्षापासून काम करत होता. मात्र त्याने काही महिन्यापुर्वी स्वत:चे मेडीकल शॉप सुरु केले होते.

श्रवणकुमार हा पटेल यांचे ग्राहक त्याच्याकडे वळवुन त्यांचे नुकसान करत असल्याचे सदानंद याने पटेल यांना सांगितले होते. तसेच त्याबाबत श्रवणकुमारला समज देणार असल्याचे सांगत सदानंद हा श्रवणकुमार याच्या मेडीकल दुकानात समज देण्यासाठी गेला होता. यावेळी श्रवणकुमार आणि सदानंद या दोघांमध्ये वाद होऊन त्यांनी एकमेकांना शिवीगाळ केली होती. त्यानंतर सदानंद याने आपल्या साथीदारांच्या मदतीने श्रवणकुमारला मारहाण देखील केली होती. त्यानंतर सदानंद याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचे तसेच पोलिसांना मॅनेज केल्याचे पटेल यांना सांगितले होते. त्यानंतर काही दिवसानंतर श्रवणकुमार याला मारहाण करणाऱ्या व्यक्तींना ५ लाख रुपये द्यायचे आहेत असे सांगुन सदानंद याने पटेल यांच्याकडे ५ लाख रुपयांची मागणी केली होती. त्याला पैसे न दिल्यास त्यांना जेलमध्ये जावे लागेल. तसेच त्यांच्या सांगण्यावरुन त्याने श्रवणकुमारला मारहाण केल्याचे सांगितले. पैसे दिले नाहीस तर तो व त्याचे मित्र पोलिसांना त्यांचे नाव सांगतील. त्यामुळे त्यांना जेलमध्ये जावेल अशी भिती घालण्यास सुरुवात केली.

मात्र पटेल यांनी त्याला नकार दिल्यानंतर सदानंद याने आपल्या मित्रासह पटेल यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांना सांगण्याची धमकी दिली. त्यामुळे घाबरुन पटेल यांनी ३ लाख ५० हजार रुपये दिले. त्यानंतर सदानंद आणि त्याच्या साथीदारांनी त्यांची पोलिसांकडे खोटी तक्रार देत त्यांना अडकविण्याची धमकी दिली.

